**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु श्री. पी. के. राऊत वकिलांमार्फत.**

१. माझे प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे तयार केला असून, तो खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. ते **निशाणी क्र. ३१** वर आहे.

**सर तपास पुर्ण..**

**उलटतपास श्री. व्हि. सी. ढाळे यांच्या मार्फत सुरू.**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व मी एकाच गावातील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व मी नातेवाईक आहोत. फिर्यादीने भिमराव बाजीराव पवार याच्यासोबत आर्थिक व्यवहार केला होता. हे मी सांगु शकत नाही की, भिमरावच्या पत्नीचे व मुलाचे नाव काय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत नाही. मी आरोपीला अंदाजे ५ ते ६ वर्षापूर्वीपासून ओळखतो. आरोपी हा फिर्यादीकडे ऊस तोडणीकरिता आला होता, त्यावेळी माझी प्रथम भेट आरोपीसोबत झाली होती. फिर्यादी हा हाळगाव येथील साखर कारखान्याचा मुकादम आहे. फिर्यादी हा सन २०१६ ते २०१९ या दरम्यान हाळगाव येथील साखर कारखान्याचा मुकादम होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने हाळगाव येथील साखर कारखान्यासोबत करार केल्याचे, मला माहिती नाही. सन–२०१८ मध्ये हाळगाव येथील साखर कारखाना ऑगस्ट महिन्यात सुरू झाला होता. हे मी सांगु शकत नाही की, त्यानंतर सदरचा कारखाना नेमका कोणत्या तारखेला बंद झाला. सदरचा कारखाना अंदाजे साडेचार महिने सुरू होता. फिर्यादीने त्यावेळी कारखान्याकडून एकूण सात लाख रूपये उचल घेतली होती. त्याबाबत कारखाना व फिर्यादी यांच्यामध्ये करार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मुकादमने कारखान्याला नेमके किती मजुर द्यावयाचे याची माहिती कारखान्याला द्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची माहिती दिल्यानंतर त्यांच्यात करार केला जातो व त्यांनतर उचलची रक्कम मुकादमास दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मजुरांचे कोरे धनादेश व नोटरी दस्त कारखान्याला दाखवावे लागतात. त्यानंतर कारखाना मुकादमास उचलची रक्कम देतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मुकादम उचल घेतलेली रक्कम मजुरांना वाटतो.

३. हे मी सांगु शकत नाही की, माझे शपथपत्रामधील फिर्यादीचा ट्रॅक्टर क्रमांक काय होता. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीचा बँक खाते क्रमांक व आरोपीचा धनादेश क्रमांक सांगु शकत नाही. फिर्यादीने आरोपीकडून वाद धनादेश सन २०१९–२० मध्ये घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला त्याची निश्चित तारीख सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीकडून वाद धनादेश

माझ्यासमक्ष घेतला नव्हता.

(आरोपीच्या विद्वान वकीलांनी केलेल्या तोंडी विनंतीवरून उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यत शेवटीच संधी म्हणून तहकुब करण्यात येतो. )

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2024.03.27 16:31:06 +0630

दिनांक – २७/०३/२०२४.
जामखेड.

(व्हि.व्हि.जोशी)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
जामखेड.